श्रीमती म.सु. कवडे, सहायक प्रबंधक, गट-ब (राजपत्रित), औद्योगिक न्यायालय, अमरावती यांच्या स्वेच्छासेवानिवृत्तीबाबत...

महाराष्ट्र शासन
कामगार विभाग
शासन आदेश क्रमांक : औन्यामुं-०६२६ /प्र.क्र.६६/काम-६
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दिनांक :- २३ जुलै, २०२६

संदर्भ- १. औद्योगिक न्यायालयाचे पत्र क्र. औन्यामुं/आस्था-१/१३८६, दि.१८.०५.२०२६.
२. औद्योगिक न्यायालयाचे पत्र क्र. औन्यामुं/आस्था-१/१८१७, दि.०७.०७.२०२६
३. श्रीमती म.सु.कवडे, सहायक प्रबंधक, गट-ब (राजपत्रित) यांचा अर्ज दि.०२.०५.२०२६

शासन आदेश :

श्रीमती मयुरी सुनिल कवडे, सहायक प्रबंधक, गट-ब (राजपत्रित), औद्योगिक न्यायालय, अमरावती यांना त्यांच्या दि.०२.०५.२०२६ रोजीच्या अर्जास अनुलक्षून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ अनुसार दि.०२.०८.२०२६ (म.पू.) पासून स्वेच्छा सेवानिवृत्त होण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. श्रीमती मयुरी सुनिल कवडे, सहायक प्रबंधक, गट-ब (राजपत्रित) यांच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही; तसेच त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे शिल्लक असल्यास ते त्यांच्या निवृत्ती वेतनाच्या देय रकमांमधून नियमोचित पद्धतीने शासनास अदा करण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांना सेवा स्वेच्छानिवृत्त होण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०७२३१५०६०४२३५४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANJUSHA VIVEK JADHAV

Digitally signed by MANJUSHA VIVEK JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=19C32983E1706CC3122B8F4304D7AD97504378DD37C1905BE087976C681D5693, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C863197461AB2B6B902905D37E84BFB69111A694D0830AEBAACA5AB371BC261C, cn=MANJUSHA VIVEK JADHAV
Date: 2026.07.23 15:07:23 +05'30'

(म. वि. जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति-

श्रीमती मयुरी सुनिल कवडे, सहायक प्रबंधक, गट-ब (राजपत्रित), औद्योगिक न्यायालय, अमरावती.

प्रत-

१) प्रधान सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ व २ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

३) महालेखापाल (लेखा परीक्षा) १ व २ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४) अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, मुंबई, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.
५) सदस्य, औद्योगिक न्यायालय, अमरावती यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.*
६) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
७) निवड नस्ती संग्रह / काम-६